(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/पदो/राखीव पोउपनि ते राखीव पोनि /२४/२०२५ दिनांक २५ /०५/२०२६

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीबीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१, व

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १४/०७/२०२१

## -: आदेश :-

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार पदोन्नती कोटयातील राखीव पोलीस उप निरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रापात्रता तपासण्यात आली असता, खालील नमूद राखीव पोलीस उप निरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने पात्र ठरविले आहे. खालील नमूद अधिकारी यांना राखीव पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि. १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आलेले आहेत.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद एकूण ८ राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून " **राखीव पोलीस निरीक्षक** " या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकात करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | राखीव पोलीस उपनिरीक्षक यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | किसन परशुराम राठोड | वाशिम (पो.प्र.केंद्र, अकोला येथे बदली आदेशित) | नाशिक | नंदूरबार |
| २. | विजय शेषराव वानखडे | पो.प्र.केंद्र, अकोला | नागपूर | लोहमार्ग, नागपूर |
| ३. | सौदागर मारुती सावरे | पो.प्र.केंद्र, सोलापूर | छत्रपती संभाजीनगर | पो.प्र.केंद्र, लातूर |
| ४. | मधुकर नारायण चौदंते | नांदेड | पुणे | पो.प्र.केंद्र, सोलापूर |
| ५. | बाबुराव हनमंत जाधव | हिंगोली | छत्रपती संभाजीनगर | हिंगोली |
| ६. | गणेश आश्रु जावळे | बुलढाणा | नाशिक | पो.प्र.केंद्र, धुळे |
| ७. | अमरलाल सोमा उईके | अमरावती ग्रामीण | पुणे | पो.प्र.केंद्र, खंडाळा |
| ८. | पवनकुमार बंन्सीरोपन सिंह | गडचिरोली | पुणे | पो.प्र.केंद्र, खंडाळा |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१५/१२/२०१७ व दि.३०/०८/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६. सदर पदोन्नती आदेशामधील राखीव पोलीस उप निरीक्षक हे जर आदेशामध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**७. पदोन्नती झालेल्या वरील सर्व पोलीस अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
पोलीस अधीक्षक, वाशिम / नांदेड / हिंगोली / बुलढाणा / अमरावती ग्रा./ गडचिरोली / नंदूरबार / लोहमार्ग, नागपूर
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला / सोलापूर / धुळे / लातूर / खंडाळा

प्रत सस्नेह सादर,

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल- १, मुंबई / महालेखापाल - २, नागपूर

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक (RSI to RPI Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. ०२/ ०९/ ११/ ११-अ/ ३६/ ४०

**( सुप्रिया पाटील - यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्था.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.